पान १ वरुन...

### कायद्याचे ज्ञान नसतांना सुप्रीम कोर्टावर टीका करणारा नरीमन गँगचा सदस्य व देशद्रोही पाखंडी वकील दुष्यंत दवे विरोधात फौजदारी कारवाईची मागणी

होण्यास व कोणताही लेख लिहण्यास मनाई करण्यात यावी अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे. याबाबत काही वकिल व मानव अधिकार कार्यकर्ते हे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती आहे.

तसेच स्वत: प्रकरणात वकिल असतांना बार कौंसिलच्या नियमानुसार त्यांना (दवे यांना) वर्तमानपत्रात केसशी संबंधीत लेख प्रकाशीत करण्यास बंदी असतांना त्यांनी लेख लिहून गंभीर व्यावसायिक गैरवर्तन (Gross Professional Misconduct) केल्यामुळे त्यांची वकिलाची सनदही रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ॲड.दुष्यंत दवे हा देशद्रोही 'नरीमन गॅंग'च्या टोळीतील एक सदस्य असून ती टोळी भारतीय सेना, पोलिस, सर्वोच्च न्यायालय, सरकार यांच्याविरोधात चुकीच्या बातम्या पसरविणे, खोटे आरोप करणे, नागरिकांमध्ये वरील संस्थांविरुद्ध अप्रीतीची, बंडाची भावना निर्माण करून आतंकवादी आणि शत्रु देशांना मदत होईल असे वातावरण निर्माण करुन भारतीय सेनेच्या व पोलीस जवानांचे मनोबल खच्ची होईल. याकरीता विविध लेख प्रकाशीत करणे, देशाच्या विकासातील विविध प्रोजेक्ट/प्रकल्पांमध्ये अडचण निर्माण करण्याकरीता जनहीत याचिका आंदोलने करून देशाला अधोगतीला नेण्याचा प्रयत्न करणे अश्या देशविघातक कारवाईत सामील असून त्यांच्या संघटीत गुन्हेगारीच्या टोळीतील इतर सदस्य निवृत्त न्यायाधीश दीपक गुप्ता, ॲड.फली नरीमन, दुष्यंत दवे यांच्याविरुद्ध देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन त्यांना त्वरीत अटक करण्याकरीता रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून प्रधानमंत्री कार्यालयाचे आदेशावरून दिल्ली पोलीसांनी चौकशी सुरु करुन तक्रारकर्ते मूर्सलीन शेख व साक्षीदार ॲड.निलेश ओझा यांचा जबाब नोंदविला आहे .

ॲड.दुष्यंत दवे सारख्याना न्यायालयात येण्यास बंदी घालणारे अनेक कायदे सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी ठरवून दिले आहेत.

### अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा होणारच...!

ऑफलाइन किंवा संमिश्र पद्धतीने घेण्याची मुभाही आयोगाने दिली. या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण कराव्यात, अशा सूचना आयोगाने विद्यापीठांना दिल्या होत्या. यूजीसीच्या निर्देशांविरोधात आव्हान देणारी याचिका महाराष्ट्र, पश्चिम बंगाल,दिल्ली आणि ओडिशा सरकारनं सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. त्याशिवाय युवासेने तर्फेही याचिका दाखल केली होती.

**यूजीसीने न्यायालयात मांडलेली भूमिका**

विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घेण्याच्या आयोगाच्या निर्णयाला युवा सेनेसह काही विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकांवर एकत्रित सुनावणी घेताना न्यायालयाने आयोगाला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आयोगाने आपली भूमिका मांडणारे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल केले होते. विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घ्यायलाच हव्यात, अशी ठाम भूमिका मांडताना त्याची कारणेही स्पष्ट करण्यात आली होती.

अंतिम वर्षांच्या परीक्षा रद्द करण्याची राज्य सरकारांची भूमिका ही देशातील उच्च शिक्षणाच्या दर्जाला घातक असल्याची भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे मांडली होती. सीबीएसई, आयसीएसईच्या परीक्षांची विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षांशी तुलना होऊ शकत नाही, असेही आयोगाने स्पष्ट केलं होतं.

सीबीएसई, आयसीएसई मंडळाने परीक्षा रद्द केल्याचा दाखला याचिकाकर्त्यांनी दिला आहे. मात्र, अंतिम वर्षांच्या परीक्षा या विद्यार्थ्यांचे करिअर घडवण्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाच्या असतात. या परीक्षांच्या आधारेच ते विविध क्षेत्रांत विशेष ज्ञान प्राप्त करतात. या परीक्षा विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेत उतरण्यासाठी आत्मविश्वास देतात. त्यामुळे अंतिम वर्षांच्या परीक्षा घेणे गरजेचे असून सीबीएसई, आयसीएसई परीक्षांची तुलना त्यांच्याशी केली जाऊ शकत नाही, असे आयोगाने म्हटलं होतं.

### सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार घेत परीक्षा घेण्यासंदर्भात भूमिका मांडली आहे.

आणि सगळीच वस्तुस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेतला होता. आपत्ती व्यवस्थापनानं तो अंतिम केला होता. पण, सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्णयाचा आदर करून भविष्यात परीक्षा कशा घ्यायची यासंदर्भात चर्चा करणार आहोत. यूजीसीकडून वेळ मागून घेण्यासाठी निर्णय घ्यावे लागतील. सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या आदेशाप्रमाणे मार्ग काढावा लागणार असून, कुलगुरूंशी चर्चा करून परीक्षा घेण्यासंदर्भात पुढील निर्णय घेतला जाईल. विद्यार्थ्यांपासून ते कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन कशा पद्धतीनं परीक्षा घेता येतील, या संबंधी योजना तयार करण्यात येणार आहे.' असं उदय सामंत म्हणाले.

**ट्विटच्या माध्यमातून टीका करणाऱ्यांनी भान ठेवावं : उदय सामंत**

सामंत म्हणाले की, 'परीक्षा न घेण्याबाबत मत असलेल्या इतर राज्यांशी चर्चा करण्याआधी राज्याचे महाधिवक्ता आणि न्याय व विधी विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहे. तसेच विद्यार्थांना परीक्षा रद्द झाल्या तरी अभ्यास करायचाच आहे. ट्वीटच्या माध्यमातून जे टीका टिप्पणी करत आहेत. त्यांनी भान ठेवावं. ३० सप्टेंबरच्या डेडलाईनबाबत बंधन नाही. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन याबाबत राज्याची भूमिका क्षभ समोर मांडणार आहे. मन स्वच्छ ठेऊन १०० विध्यार्थ्यांना परिक्षासंदर्भात मत विचारावं. त्यानंतर टीका करावी. स्वत:चं अस्तित्व टिकवण्यासाठी युवा सेनेवर टीका केली जात आहे.

### शहरी आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी आरोग्य संचालक या नवीन पदाची निर्मिती : राजेश टोपे

संचालक शहरी यांच्या सोबत उपसंचालक राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, उपसंचालक संसर्गजन्य रोग नियंत्रण तसेच कुटुंब कल्याण, इतर आरोग्य कार्यक्रम, जलजन्य, किटकजन्य आजार आणि इतर सांसर्गिक, असांसर्गिक आजार या विभागांसाठी चार सहायक संचालक असतील. राज्यातील शहरी भागामध्ये लसीकरण, साथ रोग व इतर आरोग्यविषयक कार्यक्रम अधिक परिणामकारकतेने राबविण्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी ही यंत्रणा कार्यरत राहील, असेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

# विठ्ठलाच्या पायावर अल्कोहोलयुक्त सॅनिटायझर मारण्यास वारकरी संप्रदायाचा विरोध



**विशेष प्रतिनिधी / २८ ऑगस्ट**

**पंढरपूर :** राज्यातील धार्मिक स्थळे उघडण्याबाबत आता सर्व स्तरातून आवाज उठू लागला आहे. जर राज्य सरकारने धार्मिक स्थळे उघडले तर विठुरायाच्या पायावरील दर्शन काही दिवस बंद ठेवले तरी चालेल, मात्र देवाच्या पायावर अल्कोहोलयुक्त सॅनिटायझर टाकू नका असं वारकरी संप्रदायाने म्हटलं आहे. विठ्ठल मंदिर सुरु करण्यासाठी विश्व वारकरी सेना वंचितच्या मदतीने एक लाख वारकरी घेऊन विठ्ठल मंदिर प्रवेशाचे आंदोलन करणार आहे. भाजपने उद्या राज्यभर घंटानाद आंदोलन पुकारले आहे तर सर्वच पक्षातील राजकीय नेते मंदिर उघडण्याबाबत आता आक्रमक होऊ लागले असताना, याबाबतचा निर्णय लवकरच अपेक्षित आहे.

इतर मंदिराच्या तुलनेने पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात पायावर दर्शन असल्याने याबाबत वेगळा प्रश्न उभा राहणार आहे. एखादा कोरोनाग्रस्त भाविकाने पायावर दर्शन घेतल्यास त्यानंतर येर्णाऱ्या भाविकही कोरोनाची भीती राहू शकते. हे टाळण्यासाठी देवाच्या पायावर सॅनिटायझर फवारावे लागेल आणि यालाच वारकरी संप्रदायाने विरोध दर्शवला आहे. कोरोनाचे संकट टाळण्यासाठी एकवेळ आम्ही कोरोनाची लस येईपर्यंत देवाचे मुखदर्शन घेऊ, पण पायावर अल्कोहोलयुक्त सॅनिटायझर मारु नये, अशी भूमिका वारकरी संप्रदायाने घेतली आहे. ज्या पंढरपूरचे महत्त्व देवाच्या पायावरची दर्शनाने आहे ते बाजूला ठेवण्यास वारकरी संप्रदाय तयार झाला आहे. याचसोबत कोरोनाच्या संकटकाळात सकारात्मक ऊर्जा मिळण्यासाठी भजन कीर्तनास परवानगी मिळावी ही आग्रही मागणी वारकरी करत आहेत.

मंदिर सुरु करण्याबाबत प्रशासन अजूनही साशंक असून सध्या कोरोनाची वाढती परिस्थिती पाहता मंदिर उघडणे सध्या अवघड आहे. मात्र जर सरकारने आदेश दिले तर त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार दर्शन व्यवस्था सुरु केली जाईल, असे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी विठ्ठल जोशी यांचे म्हणणे आहे. सर्वसाधारणपणे इतर काळात रोज १५ ते २० हजार भाविकांना पायावर दर्शन मिळते. मात्र सध्याच्या कोरोनाकाळात सर्व नियम पळून दर्शन द्यायचे झाल्यास कसेबसे एक हजार भाविकांना सोशल डिस्टन्स पाळून दर्शन व्यवस्था करता येईल. यासाठी ऑनलाईन दर्शन व्यवस्थेचा वापर करावी लागेल, असे विठ्ठल मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी विठ्ठव जोशी यांचे म्हणणे आहे.

# राज्यात चोवीस तासांत ३४६ पोलीस करोनाबाधित, दोघांचा मृत्यू

**विशेष प्रतिनिधी / २८ ऑगस्ट**

**मुंबई :** करोना विषाणू संसर्गाचा देशभरात विस्फोट झाल्याचे दिसत आहे. देशातील करोनाबाधितांची संख्या आता ३३ लाखांपेक्षाही पुढे गेली आहे. तर, राज्यातही करोनाचा ससंर्ग अद्यापही वाढताना दिसत आहे. राज्यातील सामान्य नागरिकांबरोबरच करोना योद्धे जमल्या जाणाऱ्या पोलिसांनाही दिवसेंदिवस करोनाचा अधिकच संसर्ग होत आहे. मागील २४ तासांमध्ये राज्यभरात आणखी ३४६ पोलीस करोनाबाधित आढळले असून, दोन पोलिसांचा मृत्यू झाला आहे.

राज्यातील करोनाबाधित पोलिसांची संख्या आता १४ हजार ६४१ वर पोहचली आहे. यामध्ये सध्या उपचार सुरू असलेले २ हजार ७४१ जण, करोनामुक्त झालेले ११ हजार ७५२ जण व आतापर्यंत मृत्यू झालेल्या १४८ जणांचा समावेश आहे. एएनआयने हे वृत्त दिले आहे.

राज्यातील १४ हजार ६४१ करोनाबाधित पोलिसांमध्ये १ हजार ५५५ अधिकारी व १३ हजार ८६ कर्मचारी यांचा समावेश आहे. सध्या उपचार सुरू असलेल्या (ॲक्टिव्ह)२ हजार ७४१ पोलिसांमध्ये ३५३ अधिकारी व २ हजार ३८८ कर्मचारी आहेत.

करोनामुक्त झालेल्या ११ हजार ७५२ पोलिसांमध्ये अधिकारी १ हजार १८७ व १० हजार ५६५ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तर, आतापर्यंत करोनामुळे मृत्यू झालेल्या १४८ पोलिसांमध्ये १५ अधिकारी व १३३ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

मागील दोन दिवसांपासून करोनाबाधित रुग्णांची संख्या दिवसाला ७५ हजारांपेक्षा जास्त संख्येने वाढत असल्याचे दिसत आहे.आरोग्य मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, देशातील एकूण करोनाबाधित रुग्णांची संख्या ३३ लाख ८७ हजार ५०१ इतकी झाली आहे. मागील २४ तासंत ७७ हजार २६६ नवीन रुग्ण आढळले आहेत. तर एक हजार ५७ जणांचा मृत्यू झाला आहे.

# सुशांतला कोणता आजार होता? सुशांतला कोणते ड्रग्स द्यायची? सीबीआयकडून रियावर प्रश्नांचा भडीमार

**विशेष प्रतिनिधी / २८ ऑगस्ट**

**मुंबई :**सीबीआयच्या सूत्रांनुसार, रियाला तपासणी कुठे व्हावी यासाठी काही पर्याय देण्यात आले होते. त्यापैकी रियाने स्वत: डीआरडीओ गेस्ट हाऊसमध्ये येण्यास तयार झाली. आज सीबीआय डीआरडीओ गेस्ट हाऊसमध्ये रिया, शोविक चक्रवर्ती, नीरज आणि सॅम्युअल मिरांडा यांची चौकशी करत आहेत

सध्या दुसऱ्या फेरीतील चौकशी सुरु आहे. यामध्ये रियाला सुशांतच्या औषधी, त्याचे डॉक्टर्स, प्रिस्क्रिप्शन, मेडिकल हिस्ट्री, सुशांतच्या कुटुंबाने जे आरोप केले आहेत त्याबाबत प्रश्न विचारले जाणार आहेत, अशी माहिती सुत्रांनी दिली आहे.

सीबीआयने चौकशीत रियाला विचारलेले प्रश्न

सुशांतला कोणता आजार होता?

उचरासाठी तू सुशांतला कोणत्या डॉक्टरकडे नेलं?

सुशांतच्या आजाराबाबत त्याच्या घरच्यांना का नाही सांगितलं?

सुशांतला कोणते ड्रग्स देत होती?

सुशांतला दिलेले ड्रग कोण पुरवायचे?

सिद्धार्थ पिठाणीबाबत मुंबईच्या सीबीआय मुख्यालयात चौकशी केली जात आहे. सिद्धार्थ चौकशीला चांगलं कॉऑपरेट कररत आहे. त्याला जेव्हाही बोलावलं जातं तो तेव्हा तो चौकशीसाठी हजर होतो. पिठाणीसोबत दोन-तीन आणखी जण आहेत, ज्यांच्याबाबत सीबीआय तपास करत आहेत.

८ जूनबाबत सुशांतच्या घरचे नोकर, मॅनेजरने जी साक्ष दिली आहे, त्याबाबतही रियाला प्रश्न विचारले जातील. एसपी नूपुर प्रसाद आणि तीन इंस्पेक्टर रियाची चौकशी करत आहेत. तर एसपी अनिल यादव हे शोविक चक्रवतीची चौकशी करत आहेत. वेळ पडल्यास सीबीआय यांना आमोरासमोर बसवून चौकशी करु शकते.

मात्र, सध्या सीबीआय ड्रगच्या अँगलने चौकशी करणार नाही. त्याचा तपास एनसीबी करत आहे. रियाच्या त्या चॅटबाबत



ज्यात ती ड्रग्सबाबत बोलत आहे, त्याबाबत पुढे चौकशी होऊ शकते. सध्या ८ जून रियाने सुशांतचं घर सोडल्यापासून ते त्याच्या मृत्यूपर्यंत प्रत्यक्षदर्शींच्या साक्ष आणि विदेश टूरबाबत प्रश्न विचारले जात आहेत

**रियाच्या वडिलांची पाच ते सहा तास चौकशी**

सुशांत सिंह राजपूत यांचे वडील केके सिंह यांनी सुशांतची गर्लफ्रेंड रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटूंबावर १५ केटींची अफरातफर केल्याचा आरोप केला होता. या संदर्भात इडीने रियाचे वडील इंदिरजीत चक्रवर्ती यांची गुरुवारी (२८ ऑगस्ट) पाच ते सहा तास चौकशी केली.

वाकोला स्थित एक्सिस बॅंकेत त्यांचं खातं आहे. या बॅंकेचे लॉकर, खातं इडीने स्कॅन केलं. तीन वाजता इडीची टीम सांताक्रुझ इथल्या वाकोला परिसरात दाखल झाली आणि तब्बल पाच ते सहा तास त्यांनी चौकशी केली. स्टेटमेंट रेकॉर्ड करुन रियाच्या संपर्कात असर्णाऱ्या लोकांनाही इडी समन्स बजावू शकते.

**राम कदम यांच्यावर गुन्हा दाखल करा, राष्ट्रवादीचे नेते अनिल गोटे मागणी**

राम कदम यांनी सुशांत सिंह प्रकरणांमध्ये ड्रॅग माफिया खत्री आणि सुशांत सिंहचे फोटो याचा संबंध असल्याचं सांगण्यात आलं होतं. यावर राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष अनिल गोटे यांनी राम कदम यांच्यावर निशाणा साधला आहे. जर राम कदमांकडे या प्रकरणाचे फोटो होते, तर तपास यंत्रणेला का दिले नाहीत, त्यावर अर्णब गोस्वामीकडे पुरावे आहेत, तर तपास यंत्रणेला दिले नाहीत. या संदर्भामध्ये प्रस्तावाला उभा करत राम कदम आणि अर्णव गोस्वामी यांच्यावर चौकशी समितीकडे पुरावे लपवल्याप्रकरणी सुमोटो दाखल करुन गुन्हा दाखल करण्याची मागणी आता राज्य सरकारकडे अनिल गोटे यांनी केली आहे

मुंबई पोलीस या प्रकारणात लुडबुड करत आहे किरीट सोमय्या

सुशांत सिंग राजपूत हत्या प्रकरणी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मुंबई पोलिसानं बाबत नाराजी व्यक्त केली.

मुंबई पोलीस या प्रकारणात लुडबुड करत आहे, असा आरोप करत त्यांनी योग्य त्या पद्धतीने काम करावे. सीबीआय याप्रकरणी काम करत आहे. त्यामुळे त्यांच्या कामात गडबड करु नये. ज्या पद्धतीने इंद्रायणी मुखर्जी केस प्रकरणी राकेश मारिया हे डायरेक्ट डिक्टेट करत होते. त्याच पद्धतीने सुशांत सिंह प्रकारणात मुंबई पोलीस आयुक्त परमबीर सिंह हे सुशांत सिंह प्रकरणात संशयास्पदरित्या काम करत होते.

तर त्यांनी या केसमध्ये आता परत हस्तक्षेप करु नये, असे मागणी सोमय्या यांनी केली आहे. तसेच, याप्रकरणी मुंबई पोलिसांचे दोन ते तीन अधिकारी हे सीबीआयच्या चौकशीमध्ये अडथळे निर्माण करत असल्याचा आरोप देखील सोमय्या यांनी केला आहे.

# श्री गणेश मंदिर, गांधी वार्डकडून कोरोना फाइटर्स यांचा सत्कार

**साहसिक वृत्त / २८ ऑगस्ट**

**हिंगणघाट :** दर वर्षीप्रमाणे यावेळी देखील गांधी वार्ड येथील श्री गणेश मंदिर उत्सव समितीकडून श्री गणेश मूर्तिची स्थापना करण्यात आली. दरवर्षी मंडळाच्या वतीने काही नविन सामजीक




उद्देश्य लक्षात ठेऊन सामान्य नागरिकांपर्यत चांगली सूचना पोहचावी याकरीता मंडळ प्रत्येक वर्षी प्रयत्नशील असते.

यावर्षी संपूर्ण जग हे कोरोना महामारी या बीमारी सोबत लढत आहे यातून आपला देश देखील सुटला नाही. अशावेळी आपल्या शहरातील नगर पालिका हिंगणघाटचे कर्त्यव्यनिष्ठ अधिकारी विशाल ब्राह्मणकार व अविनाश चव्हाण यांनी देखील लॉकडाऊन पासून ते आजपर्यंत खुप चांगल्या प्रकारे आपली कामगिरी बजावली व जास्त मेहनत घेऊन शहरातील सामान्य नागरिक कोणत्या प्रकारे सुरक्षित राहतील या करीता प्रयत्न केले आहे.

या करीता श्री गणेश मंडळ समितीकडून या दोन्ही कोरोना फाइटरचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी या दोन्ही अधिकारी यांनी मंडळाच्या या उपक्रमाची स्तुती करुन आभार व्यक्त केले. तसेच यावेळी श्री गणेश मंडळाकडून स्थापन केलेल्या श्री गणेश यांच्या मातीच्या प्रतिमाला कोरोना पासून कशाप्रकारे बचाव करता येईल याची पूर्ण सूचना श्री गणेश यांच्या मूर्तिवर चिन्हांकीत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मंदिराच्या आतमध्ये व मंडपात कोरोनाचा विषयी कशा प्रकारे जनजागृती करता येईल त्याबद्दल सूचना फलक लावण्यात आले आहे.

यावर्षी मंडळाने कोणत्याही प्रकारे लोकवर्गणी जमा न करता हा उपक्रम घडविला आहे. तसेच श्री गणेश मंदिर उत्सव समितीतर्फे २ हजार मास्क भक्तांकरीता मोफत वितरण शुरू केले आहे. तसेच टेम्परेचर तपासणी मशीन, सॅनेटाईजरदेखील भक्तांकरीता उपलब्ध केले आहे. यावर्षी उत्सव समितिनी सोशल डिस्टंसिंगचा आरती वेळी व दर्शन करीता येणाऱ्या भक्तांना पूर्ण पालन करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच उत्सव समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते याची रोज दखल घेतात. आरतीच्या वेळी फ़क्त ३ भक्त आरतीकरीता राहतील याची दखल घेण्यात आली आहे. या सर्व उपक्रम करीता गांधी वार्डमधील नागरिक पूर्णपने सहकार्य करीत आहे. श्री गणेश मंदिर परिसरात साफसफाईचे पूर्ण लक्ष देण्यात येत आहे. या पूर्ण उपक्रमामुळे श्री गणेश मंदिर उत्सव समिती गांधी वार्ड यांचे संपूर्ण शहरात कौतुक केले जात आहे.

पान ८ वरुन...

### पोखरा प्रकल्पाची अंमलबजावणी समाधानकारक नसल्यास कारवाई : कृषी मंत्री दादाजी भुसे

कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी प्रकल्पातील लाभार्थ्यांशी आणि ज्यांनी अद्याप खरेदी केली नाही अशा चार शेतर्कय़ांशी संवाद साधला. हॅलो, मी कृषी मंत्री दादाजी भुसे बोलतोय. पोखरा योजनेत तुम्ही अर्ज केला होता त्यातून स्प्रिंकलर खरेदी केले का? त्याचे अनुदान मिळाले का? इत्यादी माहिती घेत त्यांनी शेतर्कय़ांशी संवाद साधला. तसेच रवींद्र येवले या देवळी तालुक्यातील भागापूर येथील शेतर्कय़ाला येर्णाय़ा अडचणी समजून घेत बैठक संपल्यावर त्या शेतर्कय़ाच्या घरी भेट देण्यास अधिर्कायांना सांगितले.

### संपूर्ण नष्ट झालेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने ५० हजार रूपये एकरी आर्थिक मदत द्यावी

थकीत असल्याचे व त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला असलेल्यांचे निर्देशानास आणुन दिले व तातडीने धडक सिंचन विहिरीचे अनुदान देण्याची मागणी करण्यात आली तसेच सध्या जनावरांमध्ये लपी नावांच्या रोगाने थैमान घातले असून त्यावर उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा मिळावा त्याचप्रमाणे महात्मा ज्योतिबा फुले व छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत लाखों शेतकरी कर्जमाफीपासून वंचित आहेत. या शेतकऱ्यांना तातडीने कर्जमाफीचा लाभ द्यावा व जे शेतकरी नियमित कर्जफेड करतात अश्या शेतर्कय़ांकरीता ५०हजार रूपये देण्याचा शासन निर्णय अजून झाला नसून लवकरात-लवकर सदर शासन निर्णय घ्यावा अश्या विविध शेतकरी हिताच्या मागण्या केल्या असून शासनाने यावर उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आमदार समीर कुणावार यांनी दिला आहे.